# दक्षिण महाराष्ट्र साहित्य पत्रिका

महाराष्ट्र-कर्नाटक-गोवा सीमाभागातील

# बोली, भाषा आणि संस्कृती

## विशेषांक




| एप्रिल-मे-जून २०१९ | वर्ष : दुसरे | अंक : सहावा |

दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा,
कोल्हापूर

अध्यक्ष
विजय चोरमारे

उपाध्यक्ष
गौरी भोगले
भीमराव धुळुबुळू

कार्याध्यक्ष
वि. द. कदम

कार्यवाह
गोविंद पाटील

सहकार्यवाह
विनोद कांबळे

कोषाध्यक्ष
श्याम कुरळे

सदस्य
अनुराधा गुरव
दि. बा. पाटील
विलास माळी
पाटलोबा पाटील

सहसंपादक
चंद्रकांत पोतदार

मुखपृष्ठ
विजय टिपुगडे, कोल्हापूर

मूल्य : रु. ६०/-

दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभेचे मुखपत्र

# दक्षिण महाराष्ट्र साहित्य पत्रिका

(मराठी त्रैमासिक)

## एप्रिल - मे - जून २०१९

वर्ष दुसरे / अंक सहावा

संपादक
एकनाथ पाटील

सदरचे त्रैमासिक संपादक एकनाथ दादू पाटील यांनी मुद्रक निहाल सुरेश शिपूरकर-भारती मुद्रणालय, शाहुपुरी, कोल्हापूर येथे छापले आणि प्रकाशक विनोद रामा कांबळे यांनी दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा कार्यालय, जी/६, स्मृती अपार्टमेंट, बाबुजमाल रस्ता, सरस्वती चित्रमंदिरामागे, कोल्हापूर येथून प्रकाशित केले आहे. या त्रैमासिकाच्या प्रकाशनासाठी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांचे अनुदान मिळाले आहे. या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, प्रकाशक, मुद्रक, द.म.सा. सभा अथवा म. रा. सा. संस्कृती मंडळ सहमत असेलच असे नाही.

दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर

आणि

विद्या प्रसारक मंडळ, गडहिंग्लज संचलित

डॉ. घाळी कॉलेज, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

आयोजित

राष्ट्रीय चर्चासत्र

# 'महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा सीमा भागातील बोली, भाषा आणि संस्कृती

शनिवार दि. ९ मार्च २०१९

- राजर्षी शाहू प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांचा बोलीभाषेच्या स्वरूपाचा अभ्यास करणे / अजितकुमार भिमराव पाटील
- 'गावठाण' च्या बोलीभाषेचा परिचय / सुजाता संजय चोपडे
- लीळा चरित्रातील भाषादर्शन / कदम संभाजी धोंडीराम
- मराठीतून कोंकणीतील अनुवादित नाटकातील सांस्कृतिकता / प्रदिप एकनाथ कांबळे
- 'कोंडाळ' आत्मकथनांमधील बोली : एक अभ्यास / शैलजा श्रीधर शिंदे
- सीमेवरचा गाव बेळगाव : संस्कृती आणि बोलीभाषा / विजयालक्ष्मी विजय देवगोजी
- महाराष्ट्र, गोवा आणि कर्नाटक या तीन राज्यांच्या सीमा भागावर वसलेला चंदगड तालुका आणि तेथील संस्कृती व समाज जीवन / भाग्यश्री अमोल लेंढे
- महात्मा बसवण्णांच्या वचनातील भाषा / मिनाक्षी अंकुश जंगम
- धग : वऱ्हाडी बोलीभाषेचा अस्सल नमुना / राजश्री मनोहर बिसुरे
- व्यंकटेश माडगूळकरांच्या माणदेशी माणसं कथासंग्रहातील बोली भाषा आणि संस्कृती / अनुसया राजाराम इमडे
- बोली भूगोल : संकल्पना व स्वरूप / मोहन बाबुराव चव्हाण
- कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा तालुक्याची बहुसांस्कृतिकता आणि बहुभाषिकता / आनंद शामराव बल्लाळ
- महानगरीय कादंबरीतील उच्चवर्गीय भाषा / सुकुमार दादू आवळे
- सीमाभागातील भाषिक व सांस्कृतिक संचित / भीमराव जोतिबा शिंदे
- महादेव मोरे यांच्या कादंबरीतील बोली व संस्कृती / भारती श्रीधर कोळेकर, गौरी अरविंद दीक्षित
- १९८० नंतरच्या कादंबरीतील भाषा / माधव मारूती भोसले
- रत्नागिरी जिल्ह्यातील कुणबी समाजाची बोली : संगमेश्वरी बोली / ज्ञानेश्वर किसन म्हात्रे
- संत एकनाथांच्या भारुडातील लोकभाषा व लोकभूमिका / शिवाजीराव भुकेले
- आदिवासी लोककथेची बोलीरूपे / दीपककुमार वळवी
- 'महात्मा जोतिबा फुले यांच्या साहित्योतील भाषेचे वेगळेपण / सुरेश बाळकृष्ण शिंदे
- जनावरांच्या बाजारातील गुप्त बोली / जयकुमार चंदनशिवे
- A Study of Pardhi Tribe's Language in Unchgaon, Kolhapur / Shriram Abhishek D.
- Culture, Dilect & Language of Maharashtra, Karnataka & Goa Border / Gokhindikar Pooja Mohan
- कोकण, कन्नड, मराठी भाषाविचार / पांडूरंग गावडे
- भारतातील विविध बोलीभाषा आणि लोकसाहित्य / सुरेखा देशपांडे
- उपरा मधील कैकाडी बोलीचे विशेष / प्रविण भोसले
- धनगर समाजाची लोककला व लोकगीते / संदीप पाटील
- लोकसाहित्य आणि बोली / सखाराम शिंदे
- कातकरी जमातीचे समाजभाषाविज्ञान / विनायक राऊत

# महादेव मोरे यांच्या कादंबरीतील बोली व संस्कृती

भारती श्रीधर कोळेकर
गौरी अरविंद दीक्षित

निपाणी हे कर्नाटकातील बेळगाव जिल्ह्यातील व महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवर स्थित शहर असून बेळगावच्या ७५ कि.मी. उत्तरेस व कोल्हापूरच्या ३८ कि.मी. दक्षिणेस राष्ट्रीय महामार्ग ४ वर आहे. या शहराला महाराष्ट्र व कर्नाटक सीमेप्रमाणेच या दोन्ही राज्यांची सांस्कृतिक पार्श्वभूमी लाभलेली आहे. तसेच मराठी व कन्नड या दोन्ही भाषांचा समन्वयही येथे पहावयास मिळतो. इतकेच नव्हे तर निपाणी हे महाराष्ट्र-कर्नाटक सीमावादाचे केंद्र बनले आहे. येथे तंबाखू व्यवसाय मोठ्या प्रमाणात चालतो. किंबहुना निपाणी हे तंबाखूचे गाव म्हणून ओळखले जाते. तंबाखू व्यवसाय, बिडी व्यवसाय, साखर कारखाना, मोटार व्यवसाय इ. मुळे आजुबाजूच्या परिसरातील लोक निपाणीतच उदरनिर्वाहासाठी येतात. या ठिकाणी काम करणारे लोक हे विविध स्तरांतील, वेगवेगळ्या जाती-धर्मातील, गरीब-श्रीमंत, मजूर-मालक-दलाल अशा वर्गातील आहेत. काही शेतकरी वर्ग हा श्रीमंत असून तो श्रीमंती मिरविणारा, हौस भागविणारा आहे. यामुळेच निपाणीत चंगळवाद वाढीस लागला आहे. त्यातूनच चित्रपटगृहे, जुगार व दारु अड्डे, वेश्यागृहे वाढली आहेत. श्रीमंतांबरोबर मध्यमवर्गीयही याच्या आहारी गेला आहे. या परिसरात असणाऱ्या यल्लमा देवीला सोडणारे जोगते-जोगती, दादागिरी करणारे 'दादा' लोक, जत्रा-यात्रा-तमाशा, पुरुषी कामवासना, गरीब-श्रीमंत संघर्ष, भटके-फिरस्ते, उपेक्षित, पददलित, कलावंत इ. चा जीवनालेख, तेथील राजकारण इ. चे चित्रण मोरेंच्या साहित्याचे आशयविश्व होऊन येते. तेव्हा यातील भाषा ही कधी वर्गानुसार, कधी वस्तीनुसार, कधी व्यवसायानुसार तर कधी भाषिक संकरातून व्यक्त होते. त्यांच्या कथा, कादंबरीच्या लेखनविषयाबाबत मोरे म्हणतात, ''माझ्या कथा कादंबऱ्यात वखारीतील मजूर स्त्रिया, हमाल, दिवाणजी, बिछायती, आदि तंबाखू धंद्याचे जग आले. तसेच मोटार ड्रायव्हर, क्लिनर, मेस्त्री, व्हल्कनायझर, वेल्डर आदि मोटार व्यवसायाचेही वेगळे विश्व आले. आणि यामध्ये अपरिहार्यपणे मग पोलिस खात्याचे, आर.टी.ओ.चे तसेच ट्राफिकवाल्यांचे व वारयोषितांचे व जोगतिणींचेही जग उभे राहिले.''[१]

१९६० नंतरच्या काळात आपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण करुन काही ग्रामीण साहित्यिकांनी मराठी ग्रामीण साहित्यास अधिक समृद्ध केले. त्यामध्ये प्रामुख्याने डॉ. आनंद यादव, रा. रं. बोराडे, महादेव मोरे यांचा उल्लेख करता येईल. महादेव मोरे यांचा जन्म कर्नाटकातील निपाणी येथे झाला. त्यांचे शिक्षण निपाणी व कोल्हापूर येथे झाले. तसेच व्यवसायानिमित्त त्यांचे वास्तव्य काही दशके निपाणीमध्येच आहे. त्यांची जडणघडण, अनुभवविश्व निपाणी हे शहर आहे. निपाणी हे सीमावर्ती भागात असल्याने महाराष्ट्र व कर्नाटक अशा दोन राज्यातील बोलींचा प्रभाव त्यांच्यावर आहे. याशिवाय त्यांच्या कथा-कादंबरी लेखनामागे उपेक्षित शोषितांचे जग चित्रित करण्याची प्रेरणा दिसते. या प्रेरणेतूनच त्यांनी विपुल असे लेखन केले.

**महादेव मोरे यांचे साहित्य :**

- कथासंग्रह – तुझी कथा माझे शब्द, बत्ताशी, ऐन बहरात कैफ कहरात, चित्ताक, दवना, ईगीन, थ्रिल्स (अनु.) फर्रो, बेंडल, चकवा, तिंगाड, काळोखातील काळोख, गब्रू, येडचाप असे १४ कथासंग्रह.
- कादंबरी – पाव्हणा, एकोणिसावी जात, पनोती, रैत, बळी, वर आभाळ खाली धरती, वस्ती, प्रवाह, वेगळा (अनु.) स्टॅण्ड, झंगाट, आडगार, लाईन, झळा, व्हलम्, लोफड, झोंबडं, रानपाखरं इ. १८ कादंबऱ्या.
- ललित गद्य –इथे फुलांना मरण जन्मता ! (ललित लेख) चेहरे (शब्दचित्रे).

असे विपुल ग्रंथलेखन महादेव मोरेंच्या लेखणीतून शब्दबद्ध झाले आहे.

मोरे यांचे अनुभवविश्व अधिक व्यापक विविध व्यवसायांशी त्यांचा जीवनानुभव निगडीत असल्याने अनेक व्यवसाय, वस्त्या, जाती-धर्मातील लोकांशी त्यांचा प्रत्यक्ष संबंध येत असे. त्यामुळे त्यांच्या साहित्यातील बोलींचा व संस्कृतीचा अभ्यास पुढील काही मुद्द्यांच्या आधारे करता येईल.

### १) मोटार स्टॅण्ड/मोटार व्यवसायिकांची बोली :

मोरेंच्या वडिलांचा मोटार व्यवसाय असल्याने व स्वत: काही वर्षे मोरेंनाही हा व्यवसाय करावा लागला. त्यामुळे त्यांच्या कादंबऱ्यांमध्ये मोटार स्टॅण्डवरील व त्या व्यावसायिकांशी निगडीत व्यक्तींशी सतत संपर्क होत असे. त्यामुळे या विशिष्ट वर्गातील बोलींचे चित्रण येते. 'झळा', 'स्टॅण्ड', 'एकोणीसावी जात' इ. कादंबरीमध्ये या व्यवसायातील वर्णने आली आहेत. उदा. ''नझऱ्या, बॉनेट उघडून, जरा ऑईल, पानीबीनी च्यक् कर, तौरका मी पेट्रोल घेतो....'' ''प्रत्येक टायरीत

पंचवीस ते अठ्ठावीस गेज हवा आहे का नाही, ते पाहिलं. कुठल्या टायरीत कमी होती, त्यात आणखीन हवा सोडली. डिक्कीतील स्टेपनीचीदेखील हवा तपासली.'' (स्टॅण्ड) तसेच मोटार लाईनीत एखादं नवखं माणूस आलं तर ते नवखंपण या लाईनीतील माणसांना लगेच लक्षात येतं. 'झळा' मध्ये बारकूबरोबर परसू प्रथमच बदली क्लिनर म्हणून जातो. त्याचे हे नवखेपण म्हामूलालच्या लक्षात येताच तो म्हणतो; ''हे श्यांपल कुठनं आणलंस'' हे श्यांपल व्हय? हाय आमच्या गल्लीतलंच. आनी पैलंच ते इंवन ? ते आजारी पडलंय, तवर हे टेंपरवारी म्हणून....''( झळा, पृ. क्र. १०)

२) वेश्या वस्तीवरील बोली :

मोटार व्यवसाय, गॅरेज, पीठाची गिरण इ. व्यवसाय करत असताना त्यांचा अनेक व्यवसायातील व्यक्तींशी संपर्क येत असे. त्यामध्ये स्त्रिया, पुरुष, तरुण मुले, दलाल इ. लोकांशी त्यांचा संवाद, चर्चा होत असे. यातूनच कादंबरीला अनेक विषय मिळाले. तेथील अंतर्गत गुणवैशिष्ट्यांसह, पोतासह अनुभवविश्व मोरेंनी चित्रित केले. उदा. स्टॅण्ड, व्हलम्, प्रवाह,' वस्ती, आडगार इ. कादंबरी.

वेश्या अड्ड्यावरील तरुण पोरांची भाषा - ''अरे शिरश्या, लै खुष हाय रे तुझ्यावर! अरे, घे गाडीत नि न्हाट!'' ''मंजे, बीन टच झाल्याल्या पोरीगत करायला लागलीईस म्हण की आज तू. आम्ही मागिटल्यावर आम्हास्नी मिळणार, न्हाय तर न्हाई!'' (स्टॅण्ड)

''इऱ्या अंड्याला आलेली कोंबडी हाय ही! मुरगाळ त्येच्या बायली ऽ कुणी बघादेखायच्या आत! झाली लै खुषबी हाय रे तुझ्यावर! आनी पानी लै तुंबल्यालं हाय, फोडून टाक कट्टा, जाऊ दे फाटून !'' (व्हलम्)

''दहा-दहा रुपये !! का फोदऱ्याला सोनंबिनं लावलंय का काय तुझ्या?'' '' ते खरं असलं तरी तुझं, 'मशिन' का आम्ही काढून नेणार आहोत, की ते झिजणार आहे? तुझं तुझ्याजवळच राहणार आहे!.... राजीखुशीचा सौदा करायचा असला तर सांग, प्रत्येकी पाच-पाच देतो, जमलं तर पहा, नाही तर आम्ही कटतो! '' (प्रवाह)

३) दादा लोकांची बोली :

मोटार व्यवसाय, वेश्या अड्डे, बिडी कारखाना, तंबाखू वखार या व्यवसायांमुळे तेथील मालक, कामगार, दलाल अशा दादा लोकांची दादागिरी, गुंडगिरी करताना दादागिरीची भाषा, दमबाजी आपसूकच त्यांच्या कादंबरीत येते.

''तशी मी त्याची धुलाईच चालू केली आणि काही वेळाने नॉर्मलवर आल्यावर पाहतोय तर पांडे टेर होऊन पडलेला!'' (लोफड)

''हे दारुला! कच-कचभर चढवा आणि त्या युनियनमधील पोरास्नी धडा शिकवा!!'' (झोंबडं)

४) बोली संकर :

महादेव मोरेंच्या कादंबऱ्यामध्ये निपाणी व निपाणी परिसरातील सर्वसामान्यांची बोली चित्रित झाली आहे. निपाणी परिसरात विविध भाषिक समूहांचे वास्तव्य असल्याने दैनंदिन व्यवहार, व्यवसायानिमित्त एकमेकांचा संपर्क येत असल्याने त्या सर्व भाषांवर एकमेकांच्या भाषेचा परिणाम झालेला दिसतो. व मूळ भाषेतील लकब जशीच्या तशी न येता त्यामध्ये बदल जाणवतो. निपाणी व परिसरात बहुतांशी कन्नड-हिंदीचा वापर सर्रासपणे होत असल्याने त्यांच्या साहित्यात कन्नड, हिंदी तर क्वचित प्रसंगी इंग्रजी व संस्कृतीत शब्द येतात. तसेच मुस्लीम, शीख, पठाणी लोकांशी संपर्क येत असल्याने त्यांचाही प्रभाव बोलीवर जाणवतो.

- **मराठी व कन्नड मिश्रीत बोली :**

'स्टॅण्ड' कादंबरीत कन्नड मुलखातला मुरग्याप्पा फौजदार अपघातातील ड्रायव्हरला कचेरीत बोलावून म्हणतो, ''एवढासा टीचभर नि गाडी चालीवतय? लायसन हाय-साला पुच्याऽऽ! बरं न्हावूंदे ! नौला गाडी घिऊन ये, आमची बायल पिक्चर जाणारं हय! काय म्हंते? आनी त्यो, गाडीवाला साला पुच्या कुठं हयं! आरे तूच का रे तो साला पुच्याऽ आसलं का मुं केलंय बेऽ, घरात कोण औट झालंय का? आँ ? जा बेऽ, ज्या आता, मनीकडे होग! मोटारवाला तुला पन्नास रुपय नुकसान भरपाय देल! ये ऽ पानपट्टीवाल्याऽ दिवून टाक रे ह्येला पन्नास ! काय म्हंते मी? दिवून टाकते ना? हां. बरुबर! जाव आता! होग! औट !! ( पृ. क्र. २१८) तसेच 'झंगाट' मध्ये ''बीगर टाईम नि बीईम, आमच्या खातच आशलं हाय म्हंता पाटीलऽ, तीतं कोंच्या टायमाचं काय काम उट्येल्, त्येचा काय न्येम नाय! तुमाला तर समदं ठाऊकच हाय, येत्यान् ईल्लं?'' अशी कन्नड मिश्रीत मराठी भाषा मोरेंच्या कादंबऱ्यांमध्ये येते.

- **मराठी व संस्कृत मिश्रीत बोली :**

क्वचितप्रसंगी इंग्रजी, संस्कृत शब्द, वाक्येही येतात. उदा. ''पण अखेर शेवटी ह्या बेरीज वजाबाकीतून हाती काहीच राहिलं नाही, तर मात्र माझ्या हातचा आधार घ्यायला जरुर ये...! अच्छा बजरंग वुईश यू गुड लक!! शुभास्ते पंथान: संतु:!!''

- **मराठी-इंग्रजी मिश्रीत बोली :**

''ब्रेव्हो, आय मीन'', ''थँक्यू, योगेन! तुझ्या शुभेच्छेबद्दल आभार!'' (लोफड) ''गावातल्या आठ-दहा तंबाखूच्या वखारीतून व तितक्याच दुकानातून न् घरातून साळुत्यांची 'आरडर' आहे. हे आठवताच तो उठला. निदान तितका माल आज दुपारतोर 'कम्प्लीट' कराय पाहिजे होता आणि मग दुपारला गावात जाऊन त्येची 'डिलीवरी' अशी सगळी आज कामाची तापद्रा उडणार होती.'' (वस्ती)

- **हिंदू-मुस्लीम बोली :**

'रानपाखरं' मधून हिंदू-मुस्लीम बोलीच्या प्रभावातून सुशिक्षित मास्तर व अशिक्षित 'रैत' यांच्यामधील संवादातून आलेली बोली, ''मास्तर, याक इचारायचं हुतं, इच्यारु? विचार की, त्येला आनी परवानगी कशाला काढाय पायजे? समजा, तिथं एखादा सडीसोट गडी गावला, गावला का? बरं गावला मग त्यो तितं गेला, गेला का? बरं गेला, फुडं? फुड काय? त्येनं श्यात कसं करायचं, त्या मध्याचा सारा आट्टाला बारदाना कसा संभाळायचा? (पृ. ६)

- **शीख बोली :**

या परिसरात मोटार व्यवसायाच्या निमित्ताने अनेक जाती धर्मातील व्यक्तींचा संपर्क येत असे. या व्यवसायात शीख लोकही मोठ्या प्रमाणावर असलेने त्यांच्या बोलीचाही आढळ येथे जाणवतो. उदा. ''चलो आकाराम.... ह्या गड्डीन्हांदे, थोडी थोडी च्याय पियेंगे सामनेवाली होटल में.'' (लाईन, पृ. क्र. १७१)

''आखीर मिनिस्टर के गड्डीपर है तू. कौन स्साला, लायसन देता नही, देखता हूँ! वैसे मेरी भी जान पहचान है - आरट्यु ऑफिस में ! कायदे के अनुसार तू केवळ टेस्टींग की फी भरने का..... बीना टेस्ट लिये, ट्रायल लिये मै तुझे लायसन निकाल देतूँ....! तू भी क्या याद करेगा (पृ. क्र. १७६).

- **पठाणी-मराठी बोली :**

''शेठ जरा बाहर आव, थोडा काम है....''
'क्या है?'
'मुझे थोडा रुपिया चाहिए!'
'क्यो? काहे को?'
'मेरा दोस्त बिमार है शेठ....'
'कौनसा दोस्त....?'
'वो उस वक्त तुम्हे मेरे पास लाया था वो, महेबूब...'
'किधर है वो?'
'उधर, उस गाडी में....'
'अरे मेहबूब मियाँ, ये क्या हालत बनायी रख्खी है, अं! क्या इष्कने मेहबूब को निकम्मा कर दिया क्या?''
(एकोणीसावी जात, पृ. क्र. १५७)

**५) भटक्या-फिरस्त्यांची बोली :**

समाजामध्ये जे विविध वर्ग, गट, स्तर इ. नुसार भाषा भिन्न-भिन्न वापरली जाते. तशीच ती जातीय स्तरानुसारही असते. 'निपाणी परिसरातील बोलली जाणारी भाषा ही विविध वयोगट, तरुण, प्रौढ स्त्रिया, पुरुष इ. वयोगटानुसार येते. तशीच मांग-गारुडी, डोंबारी, बेलपत्तारी, डवरी, मेहतर, मुडीकर, मेंढजोशी, फासेपारधी, लमाणी, नंदीबैलवाले, माकडवाले, अस्वलवाले, गोसावी, बैतं मागणारी इ. भटक्या लोकांचे त्यांच्या भाषेसहीत वास्तव चित्रण मोरे करतात. 'वस्ती' कादंबरीत आलेले डोंबारी बोलीचे चित्रण 'काल रामलाल शेटजींच्या पोराचं लगीन झालं न्हवं? हंऽ, त्योच त्यो वस्तीजवळचा, तर त्या लगनाची जेवणावळ, त्येच्या वखारीत उठाय् लागलीया! चलाऽ, खपला तर खपलाऽ !!

**६) श्रमिक- कामगारांची बोली :**

निपाणी परिसरातील शेतमजूरी, टॅक्सी व्यवसाय, गॅरेज, हॉटेल व्यवसाय, तंबाखू वखार, विडी कारखाना इ. व्यवसायाच्या निमित्ताने तेथे काम करणाऱ्या कामगारांची शेतमजूर, दिवाणजी, ड्रायव्हर, हेल्पर पोरे, वेटर, लोहार, सुतार, कारकून, क्लीनर, स्टेपनी मेकर इ. शी संवाद होत असत. प्रत्येक व्यवसायाची अशी एक स्वतंत्र बोली असते. तशी तेथील मालकाची, कामगाराची अशी स्वतंत्र बोली असते. त्याचे प्रभावी चित्रण मोरे यांनी 'रैत', 'रानपाखरं' कादंबरीत केले आहे. जयसिंग हा लहानपणापासून इनामदारांकडे काबाडकष्ट करतो. २००-३०० रुपयात सुखीही असतो. पण मास्तरांच्या रैताच्या विचाराने ही नोकरी सोडायचा विचार करतो. पण तसे धाडसही त्याच्यात नाही अशावेळी त्याच्या (एका कष्टकरी व्यक्तीच्या) मनात आलेले विचार त्याला अस्वस्थ करतात. ''काय म्हणतील इनामदार, काय समजतील लोक? खाल्ल्या अन्नाला जागला न्हाई, आसं म्हंतील.'' (पृ. क्र. ९) किंवा ''म्हंजे, खाल्ल्या अन्नाला जागायचं, तर पुरी जिनगानी मालकाकडं घाणवट ठेवायची का काय?'' (पृ. क्र. ७)

मोरे यांचे वास्तव्य महाराष्ट्र-कर्नाटक सीमारेषेवरील निपाणीत असल्याने तसेच शेती, मोटार व्यवसाय, गिरणी कामगार, मिस्त्री इ. व्यवसाय करताना त्यांचा संपर्क अनेक अठरापगड जाती -धर्मियांशी, भटके, दलित, पददलित, फिरस्ते इ. शी आला. त्यामुळे त्यांचे अनुभवविश्व समृद्ध आहे. त्यातूनच व्यापक मानवी जीवनदर्शन त्यांच्या साहित्यातून घडते. आतापर्यंत मराठी साहित्यातून न आलेले असे तंबाखू व्यवसाय, मोटार व्यवसाय, वेश्या, त्यांचे दलाल, सुशिक्षित बेकार, जोगतिणी, भटके -फिरस्ते व्यवसायाच्या निमित्ताने व आर्थिक विवंचनेत सापडलेली माणसे, स्त्रियांकडे वाकड्या नजरेने पाहणारे पुरुष, पोटासाठी वेश्या व्यवसाय करणाऱ्या स्त्रिया, रात्रंदिवस बिडी वळणारे स्त्री-पुरुष इ. बारकाव्यासह वेगळे जग त्यांच्या साहित्यातून आले आहे. त्यांच्या साहित्यलेखनातील वेगळेपणाबाबत र. बा. मंचरकर लिहितात, '' वेगळा परिसर, वेगळा स्तर, ग्रामीण भागातील वैशिष्ट्यपूर्ण व्यवसाय यातून त्यांची साहित्यसृष्टी आकार घेते. राबणाऱ्या, बिड्या बांधणाऱ्या, शरीर विकणाऱ्या स्त्रिया, शेतावर कुळ म्हणून काम करणारे, ट्रकबरोबर भन्नाट जगणारे पुरुष, नाना लडतरी करीत जगणारे डोंबारी, मांगगारुडी यांनी त्यांचे कादंबरीविश्व गजबजून गेले आहे.''[२] तसेच विविध व्यवसायानुसार, जाती-धर्मानुसार, वर्गानुसार विविध स्वभावाच्या व्यक्ती व त्यांची वेगवेगळी बोली आली असून विविध वर्ग, व्यवसाय, जाती-धर्मानुसार निपाणी व परिसरातील कन्नडच्या प्रभावाने अनेक शब्द, वाक्य, वाक्प्रचार, म्हणी, सुविचार, रुपकीकरण, संकरीत शब्दनिर्मिती/बोली इ. मुळे मराठी साहित्यात मोलाची भर घातली आहे.

**निष्कर्ष :**

१. मोरे यांच्या कादंबरी लेखनामुळे निपाणी परिसरातील बिडी कारखाने, तंबाखू वखार, तेथील कामगार, मिस्त्री, गॅरेज मालक, हॉटेल चालक, जोगतिणी, वेश्या, त्यांचे दलाल इ. उपेक्षित, वंचित वर्गाला साहित्यामध्ये प्रथमच स्थान मिळवून दिले आहे.
२. मोटार व्यावसायिकांच्या बोलीतून मराठी साहित्यात अनेक इंग्रजी व तांत्रिक शब्दांची भर घालून आजपर्यंत मराठी साहित्याला अपरिचित असलेल्या 'मोटार लाईनीतील' जीवंत मराठीची ओळख करुन दिली.
३. त्यांच्या लेखनातून आलेल्या शिव्या अथवा अश्लिल शब्दांचा वापर हा पात्रांचे स्वभावविशेष स्पष्ट करण्यासाठी प्रेम, राग, चीड, संताप, वैताग इ. भावनांचे दर्शन घडविण्यासाठी व त्यांच्या जगण्याचा एक भाग म्हणून केला गेला आहे.
४. व्यवसायानिमित्त विविध जाती-धर्मियांशी संपर्क येत असल्याने संवादामध्ये कन्नड, हिंदी, संस्कृत, मुस्लीम, शीख, पठाणी इ. बोलीतील काही शब्द मराठीत रुढ झाले.
५. मोरे यांच्या कादंबरी लेखनाने मराठी ग्रामीण कादंबरीविश्वाला एक नवा आयाम प्राप्त झाला आहे.
६. त्यांच्या कादंबरीतील भाषेतून तेथील भाषिक व सांस्कृतिक पदर उलगडले जातात.
७. मोरे यांनी प्रत्यक्ष जीवनानुभव व भाषा यांचा समन्वय साधून वास्तव जीवनाचे चित्रण केले आहे.
८. आशय-विषयाच्या वेगळेपणाबरोबरच मोरे यांनी निपाणी परिसरातील सीमावर्ती बोली व वास्तव जीवनानुभवामुळे कोल्हापूरी बोली व मराठी कादंबरीलाही अधिक समृद्ध केले.

**संदर्भ ग्रंथ :**


1) डॉ. सोनवणे ज्ञानेश्वर. 'कादंबरीकार महादेव मोरे एक चिकित्सक अभ्यास', स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती जानेवारी २००६, पृ. क्र.३.
2) डॉ. पाटील संजय. 'महादेव मोरे यांचे साहित्य', दर्या प्रकाशन, पुणे, आवृत्ती पहिली, जानेवारी, २०१०, पृ.क्र. २७०.
3) मोरे महादेव. 'स्टॅण्ड', नवसाहित्य प्रकाशन, बेळगाव, प्रथमावृत्ती २५ जानेवारी, १९७८.
4) मोरे महादेव. 'प्रवाह', नवसाहित्य प्रकाशन, बेळगाव, प्रथमावृत्ती ९ जानेवारी, १९७६.
5) मोरे महादेव. 'लोफड', अजब पुस्तकालय, कोल्हापूर (आवृत्ती, वर्ष उपलब्ध नाही).
6) मोरे महादेव. 'झोंबडं', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती १९९०.
7) मोरे महादेव. 'वस्ती', करवीर प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती १४ मे १९७५.
8) मोरे महादेव. 'लाईन' (आवृत्ती, वर्ष, प्रकाशन उपलब्ध नाही).
9) मोरे महादेव. 'एकोणीसावी जात', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, (आवृत्ती उपलब्ध नाही) १ मे २०१५.
10) divyamarathi.bhaskar.com. २४.२.२०१९, ८.२१आ.
www.pudhari.news>news>kolhapur, साळुंखे रमेश, 'पीठाक्षरातून मराठीला गौरविणारा अवलिया', Published on Feb. २७, २०१८, ७.५७ आ., २४.२.२०१९, ८.३५ आ.